पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
e-mail :sp.washim@mahapolice.gov.in Website:www.washimpol

.....
.....

दिनांक :– १९/०५/२०२५

प्रेस नोट

किडनॅप झालेल्या ईसमाचा शोध घेवुन नवी मुंबई पोलीसांच्या दिले ताब्यात आरोपीस अटक.

ए.पी.एम.सि.पोलीस स्टेशन नवी मुंबई चे सपोनि. प्रभाकर शिउरकर यांचा दि.१९.०५. २०२५ चे रात्री २.०० वा. फोन आला मुंबई येथुन पंकेश संजय पाटील वय २८ रा.वरद, नवि मुंबई यांचे अपहरण झाले आहे. पोलीस स्टेशन ए.पी.एम.सी.येथे अप.नं.२९७/२०२५ कलम १४०(१), १२६(२), १४२, १३५, ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

ए.पी.एम.सि.पोलीस स्टेशन नवी मुंबई यांनी पाठविलेल्या माहितीच्या आधारे गुन्हयातील आरोपी १) ऋषीकेश इंदूभुषन इंगोले, वय २५ वर्ष, रा.कोडाळा झामरे, ता.जि.वाशिम. २) मंगेश अस्तरकर वय २७ वर्ष, रा.जोडगव्हाण यांचा ०८ तासाचे आत शोध घेवुन ताब्यात घेतले. त्यांचेकडुन मुंबई येथुन किडनॅप केलेल्या इसमाची माहिती घेतली असता, त्यास केनवड शेतशिवारातील एका टिनाचे शेड मध्ये हातपाय बांधुन ठेवले असल्याची कबुली दिली. तात्काळ केनवड येथील शेतशिवारात पोहचुन किडनॅप केलेल्या व्यक्तीची (पिडीत) सुटका केली. आरोपी व किडनॅप केलल्या इसमास गुन्हयात वापरलेल्या स्विफट डिझायर गाडी व मोबाईलसह नवी मुंबई पोलीसांचे ताब्यात दिले आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. अनुज तारे, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती लता फड मॅडम, सहा.पोलीस अधीक्षक, नवदिप अग्रवाल, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण महल्ले, सपोनि.योगेश धोत्रे, स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार विनोद सुर्वे, प्रशांत राजगुरु, संतोष कंकाळ, ज्ञानदेव म्हात्रे, दिपक घुगे, विठ्ठल महाले, अमोल इरतकर, संतोष वाघ, सुनिल तायडे यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम